महाराष्ट्र वन विभाग

Pench Tiger Reserve MAHARASHTRA

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**Office of the Executive Director, Pench Tiger Conservation Foundation, Nagpur**
**कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर यांचे कार्यालय**
**३ रा माळा, संचार लक्ष्मी बिल्डींग (BSNL Building), कस्तुरचंद पार्क, नागपूर - ४४० ००१**

**दुरध्वनी क्र. ०७१२ - २५६०७२७/२५६०७४८** **Email ID :. edpenchfoundation@mahaforest.gov.in**
**Website:- www.mahapenchtiger.com** **Safari Booking / सफारी बुकींग: www.mahaecotourism.gov.in**

**क्रमांक**:-पेटाकंफा/१२१/ ३६३ /२१-२२ दिनांक. १६/१२/२०२१

प्रति,

प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने),
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय,
नागपूर

**विषय**:- पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर महाराष्ट्र पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) बाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) बाबत जाहिरात ही स्थानिक दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व दैनिक नवभारत वृत्तपत्रामध्ये दि. १८/१२/२०२१ (शनिवार) रोजी प्रकाशित करण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) मधील पदांची पात्रता व इतर तपशील आपले संकेतस्थळावर प्रकाशित करण्याकरिता या सोबत पाठविण्यात येत आहे. तरी सदरहु माहिती त्वरीत आपले संकेतस्थळावर (Upload) प्रकाशित करण्यात यावी, हि विनंती.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

**(आर. एम. रामानुजम)**
कार्यकारी संचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान,
नागपुर

प्रतिलिपी :- श्री. योगेश काळे, NIC Programmer, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर यांचे कार्यालय यांना माहिती व पुढील कार्यवाही करिता अग्रेषित.

# पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान,नागपूर, महाराष्ट्र
## पदभरती (कंत्राटी पध्दतीवर)

पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर येथे ११ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर Biologist, Junior Research Fellow, Veterinary Officer, Ecotourism Manager, Law Officer, Livelihood Expert, Data Entry Operator, Office Assistant, Survey Assistant ई. जागा भरावयाच्या आहेत.

तसेच NAFCC प्रकल्पा करीता, Senior Research Fellow, Data Entry Operator ही पदे सुध्दा भरावयावी आहेत.

सदर पदांची पात्रता व इतर तपशिलासाठी दि. १८/१२/२०२१ पासुन **http://www.mahaforest.nic.in** या संकेत स्थळाला भेट दयावी. तसेच पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या कार्यालयामध्ये नोटीस बोर्डवरुन सुध्दा दि. १८/१२/२०२१ पासुन तपशिल प्राप्त करावे. तसेच परिपुर्ण बायोडाटा आणि इतर कागदपत्रे कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, ३ मजला संचार लक्ष्मी बिल्डींग (बी.एस.एन.एल बिल्डींग) श्रीमोहीनी कॉम्प्लेक्स जवळ, कस्तुरचंद पार्क, नागपुर - ४४०००१, दुरध्वनी क्र. ०७१२-२५६०७२७ / २५६०७४८ यांच्या कार्यालयाच्या ई-मेलवर **edpenchfoundation@mahaforest.gov.in** दि. ३१/१२/२०२१ रोजी १७.०० वाजेपर्यंत किंवा त्याआधी पाठवावे.

**(आर. एम. रामानुजम)**
कार्यकारी संचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान,
नागपुर

# जाहिरात दिलेल्या पदांची पदसंख्या व मानधन

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण पद | मानधन |
|---|---|---|---|
| 1. | Biologist (जीवशास्त्रज्ञ) | 1 | 30,000/- |
| 2. | Junior Research Fellow (कनिष्ठ संशोधन सहाय्यक) | 1 | 25,000/- |
| 3. | Veterinary Officer (पशुवैद्यकीय अधिकारी) | 1 | 50,000/- |
| 4. | Ecotourism Manager (निसर्ग पर्यटन व्यवस्थापक) | 1 | 20,000/- |
| 5. | Law Officer (कायदा अधिकारी) | 1 | 50,000/- |
| 6. | Livelihood Expert (उपजिवीका तज्ञ) | 1 | 30,000/- |
| 7 | Data Entry Operator (डेटा एन्ट्री ऑपरेटर) | 2 | 12,500/- |
| 8 | Office Assistant (कार्यालयीन सहाय्यक) | 3 | 10,000/- |
| 9 | Survey Assistant (सर्वेक्षण सहाय्यक) | 1 | 15,000/- |
| **NAFCC Project** | | | |
| 10 | Senior Research Fellow (वरिष्ठ संशोधन सहाय्यक) | 1 | 30,000/- |
| 11 | Data Entry Operator (डेटा एन्ट्री ऑपरेटर) | 1 | 15,000/- |

**टिप :-**

१. वैयक्तिक मुलाखतीसाठी केवळ प्राथमिक निवड (Short listing) झालेल्या उमेदवारांनाच बोलाविण्यात येईल. मुलाखतीकरीता येणाऱ्या उमेदवारांना कोणताही भत्ता (TA/DA) लागू राहणार नाही. मुलाखतीची तारीख व वेळ Short listing झालेल्या उमेदवारांना वेगळयाने कळविण्यात येईल.

# जाहिरात दिलेल्या पदांची शैक्षणीक व अतिरिक्त पात्रता

| अ. क्र. | पदाचे नाव | एकुण पद | मानधन | मुख्यालय | आवश्यक शैक्षणीक पात्रता | अतिरिक्त पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | Biologist (जीवशास्त्रज्ञ) | ०१ | ३०,०००/- | सिल्लारी पेंच व्याघ्र प्रकल्प | वन्यजीवन विज्ञान / प्राणीशास्त्र / वानिकी / वनस्पतिशास्त्र / पर्यावरणशास्त्रा मध्ये पदव्युत्तर किमान ६०% गुणांसह उत्तीर्ण व पीएचडी. | वन्यजीव क्षेत्रात ३ वर्षांचा अनुभव, वन्यजीव विषयक तांत्रिक कामांचा अनुभव.<br>व्याघ्र सनियंत्रण कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य |
| २ | Junior Research Fellow (कनिष्ठ संशोधन सहाय्यक) | ०१ | २५,०००/- | बोर व्याघ्र प्रकल्प | वन्यजीव विज्ञान / प्राणीशास्त्र / वानिकी / वनस्पतिशास्त्र / पर्यावरणशास्त्र /वन्यजीवन विज्ञान मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी किमान ६०% गुणांसह. | वन्यजीव क्षेत्रात किमान १ वर्षाचा अनुभव. वन्यप्राणी सनियंत्रण कामांचा अनुभव.<br>व्याघ्र सनियंत्रण कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य |
| ३ | Veterinary Officer (पशुवैद्यकीय अधिकारी) | ०१ | ५०,०००/- | सिल्लारी पेंच व्याघ्र प्रकल्प | स्नातकोत्तरमध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठातून ६०% गुणांसह पदव्युत्तर पदवी. वन्यजीव विषयासह पदव्युत्तर पदवी (एम.व्ही.एस.सी) ला प्राधान्य देण्यात येईल. | वन्यजीव, उपचार व हाताळण्याचा अनुभव. पशुवैद्यकीय शास्त्राच्या क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा व्यावहारिक अनुभव. |
| ४ | Ecotourism Manager (निसर्ग पर्यटन व्यवस्थापक) | ०१ | २५,०००/- | सिल्लारी पेंच व्याघ्र प्रकल्प | कोणत्याही शाखेतील पदवीधर, हॉस्पिटॅलिटी आणि हॉटेल मॅनेजमेंट / पर्यटन व्यवस्थापन यात पदविका | मराठी, हिंदी आणि इंग्रजीमध्ये चांगले संवाद कौशल्य. |
| ५ | Law Officer (कायदा अधिकारी) | ०१ | ५०,०००/- | नागपुर | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्याची पदवी तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियाने घेतलेली अखिल भारतीय बार परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यांनी ॲडव्होकेट्स ॲक्टनुसार राज्य बार कौन्सिलमध्ये वकिल म्हणून नोंदणी केलेली पाहिजे. शैक्षणिक अर्हता व अनुभव<br>१. मान्यता प्राप्त विद्यापीठातून कायद्याचा पदवीधर व सनदधारक.<br>२. जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी किंवा विधी व न्याय विभागामधुन सेवानिवृत्त झालेले सहसचिव/उपसचिव/अवर सचिव या दर्जाचे अधिकारी या शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेले असावा.<br>३. करार पध्दतीने नियुक्ती करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याचे दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी. | नागपूर प्रादेशिक वनवृत्तांर्गत नागपूर, वर्धा, भंडारा व गोंदिया या वनविभागातील व सामाजिक वनीकरण विभागातील तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)-पुर्व, नागपूर व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व वन्यजीव विभागातील आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा., नागपूर कार्यालयातील जमिन विषयक, वनगुन्हे व आस्थापना विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी. वनविभागाचे न्यायालयीन प्रकरण हाताळण्याचे किमान ३ वर्षाचा अनुभव. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ४. करार पध्दतीने नियुक्ती करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही साक्ष झालेली नसावी.<br>५. उमेदवार वन विषयक, फौजदारी व दिवाणी विषयक, सेवा व आस्थापना तसेच कामगार विषयक बाबीत ज्ञान संपन्न असावा.<br>६. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. | |
| ६ | Livelihood Expert (उपजिवीका तज्ञ) | ०१ | २५,०००/- | बोर व्याघ्र प्रकल्प/उमरेड | सामाजिक कार्य शाखेत पदव्युत्तर पदवी (MSW) / ग्रामीण व्यवस्थापनात/ कृषी व्यवस्थापनात एमबीए. ग्रामीण क्षेत्रात उपजिवीका तज्ञ म्हणुन किमान २ वर्षाचा अनुभव किंवा कोणत्याही शाखेतील पदवीधर व उपजिवीका तज्ञ या कामाचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव. | कामाच्या नियोजनाचा अनुभव, उपजीविका सुधारणा कामाचा अनुभव, पर्यावरण सुधारणा कार्यक्रम, कार्यालयीन कामकाज व्यवस्थापन, पर्यटन व्यवस्थापन, जनसंपर्क या सर्व कामाचा अनुभव. |
| ७ | Data Entry Operator (डेटा एन्ट्री ऑपरेटर) | ०२ | १२,५००/- | नागपुर | कोणत्याही शाखेची पदवी टंकलेखन वेग- इंग्रजी -४० आणि मराठी - ३० (मान्यताप्राप्त संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक) MSCIT किंवा तत्सम संगणक परीक्षा पास. | एम.एस.ऑफिस मध्ये अनुभव आणि चांगले संभाषण कौशल्य, इंटरनेट हाताळणी, अकाउंटेंसीचा अनुभव पसंत केला जाईल. वनविभागात काम करण्याचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल. |
| ८ | Office Assistant (कार्यालयीन सहाय्यक) | ०३ | १०,०००/- | नागपुर | कोणत्याही शाखेतील पदवीधर, टंकलेखन वेग इंग्रजी -४० श.प्र.मी., मराठी -३० श.प्र.मी. (मान्यताप्राप्त संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक). | एमएस ऑफिसमध्ये अनुभव आणि चांगले संभाषण कौशल्य, इंटरनेट हाताळणी, अकाउंटेंसीचा अनुभव असल्यास प्राधान्य. फाऊन्डेशन मध्ये तत्सम कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल. |
| ९ | Survey Assistant (सर्वेक्षण सहाय्यक) | ०१ | १५,०००/- | नागपुर | कोणत्याही शाखेतील पदवीधर, टंकलेखन वेग इंग्रजी -४० श.प्र.मी., मराठी -३० श.प्र.मी. सर्वेक्षण / जमीन विषयक / जीआयएस मध्ये अनुभव. | सिमांकन आणि सर्व्हे क्षेत्राचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. |
| | | | **NAFCC PROJECT** | | | |
| १० | Senior Research Fellow (वरिष्ठ संशोधन फेलो) | ०१ | ३०,०००/- | नागपुर | सामाजिक कार्य शाखेत पदव्युत्तर पदवी (MSW) / ग्रामीण व्यवस्थापनात/ कृषी व्यवस्थापनात एमबीए. ग्रामीण क्षेत्रात उपजिवीका तज्ञ म्हणुन किमान २ वर्षाचा अनुभव किंवा कोणत्याही शाखेतील पदवीधर व उपजिवीका तज्ञ या कामाचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव.<br>हवामान बदल (Climate Change) बाबत कामांचा अनुभव असल्यास प्राधान्य. इंग्रजी भाषेचे (लिहीणे, वाचणे, बोलणे) उत्तम ज्ञान असणे आवश्यक, संगणकाचे अनुभव आवश्यक, स्वतंत्रपणे अहवाल तयार करण्याची क्षमता आवश्यक.<br>इंग्रजी भाषा (लिहिणे, वाचणे, बोलणे) उत्तम ज्ञान असणे आवश्यक | वन्यजीव जीवशास्त्र क्षेत्रात ३ वर्षांचा अनुभव, वन्यजीव विषयक तांत्रिक कामांचा अनुभव. हवामान बदल विषयक कामाचा अनुभव, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील ज्ञान, संगणक विषयक ज्ञान |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | Data Entry Operator | ०१ | १५,०००/- | नागपुर | कोणत्याही शाखेची पदवी, इंग्रजी भाषेचे (लिहीणे वाचणे, बोलणे) उत्तम ज्ञान असणे आवश्यक, टंकलेखन वेग- इंग्रजी -४० आणि मराठी - ३० (मान्यताप्राप्त संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक) MSCIT किंवा तत्सम संगणक परीक्षा पास. | एम.एस.ऑफिस मध्ये अनुभव आणि चांगले संभाषण कौशल्य, इंटरनेट हाताळणी, अकाउंटेंसीचा अनुभव पसंत केला जाईल. वनविभागात काम करण्याचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल. |

टिप:-

१) सर्व पदांना मराठीचे पुरेसे ज्ञान (वाचन, लिहीणे, बोलणे) अत्यावश्यक आहे.

२) वरील तक्त्यातील स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या मुख्यालया व्यतीरिक्त निवड झालेल्या उमेदवारास कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर यांचे आदेशानुसार त्यांचे कार्यक्षेत्रामधील ईतर कोणत्याही ठिकाणी काम करावे लागेल.

३) पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) मधील पदाकरिता आवेदन ईमेल वर सादर करते वेळी **फक्त आपला बायोडाटा (Resume) व अर्ज (Application)** या कार्यालयाचे ईमेल edpenchfoundation@mahaforest.gov.in वर सादर करावे. वरील प्रमाणे दर्शविलेल्या शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता बाबतचे दस्ताऐवज मुलाखतीच्या वेळेस दाखविण्यात यावे याबाबत नोंद घ्यावी. कोणतेही इतर कागदपत्र अर्जासोबत जोडू नये.

४) उमेदवार हा कोणत्याही इतर शासकिय, निमशासकिय अशासकीय संस्था किंवा संघटना यांचा पदाधिकारी असता कामा नये.

५) सदर पदे ही पूर्णवेळ असल्याने या काळात उमेदवाराला इतरत्र काम/प्रॅक्टीस करता येणार नाही.

वरिल सर्व पदाबाबत संगणकाचे पुरेसे ज्ञान अत्यावश्यक/आवश्यक आहे.

**(आर. एम. रामानुजम)**
कार्यकारी संचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपुर

O/C